**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

पुणे पोलीस

**प्रेसनोट क्र. ६७ दि. ०९/०१/२०२०**

**हडपसर पो स्टे पुणे शहर**

**प्रेस नोट ता. ०९/०१/२०२०**

**बाप से बेटा सवाई**

**घर फोडी, बसमध्ये व वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस हडपसर पोलीसांकडुन अटक**

हडपसर पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी हे जबरी चोरी, घरफोडी चोरी, वाहन चोरी व बसमधील चोरीच्या अनुषंगाने हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत पेट्रोलिग फिरत असताना पो.शि. नितीन मुंढे, पो.ना. विनोद शिवले, पो.शि. शाहिद शेख, पो.शि. अकबर शेख यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पांढरे मळा हडपसर पुणे येथील कॅनॉल लगत असलेल्या रोडवर एक इसम चॉकलेटी रंगाच्या मोटार सायकल नंबर नसलेल्या गाडी जवळ थांबुन सोन्याचे दागिने रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना दाखवुन ते विकण्याचा प्रयत्न करीत आहे अशी बातमी मिळाली. त्यांनतर तपास पथकातील अधिकारी सपोनि चव्हाण व कर्मचारी यांनी बातमीचे ठिकाणी जावुन आडबाजुस थांबुन पाहणी करुन सापळा लावुन इसम नामे अजयसिंग अर्जुनसिंग दुधानी वय २० वर्षे रा. घरकुल नंबर ७२, सटवाईनगर मांजरी बुद्रुक ता. हवेली जि. पुणे यास पकडले असता त्याचे हातामध्ये एक सोन्याचे मणी मंगळसुत्र, एक सोन्याचे गंठण, एक सोन्याचे नेकलेस व एक सोन्याची साखळी, एक सोन्याची मनी गंठण व दोन कानातील सोन्याच्या रिंगा असे एकुण ९५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व चॉकलेटी रंगाची ॲक्टिव्हा मोटार सायकल नंबर नसलेली गाडी असे एकुण ५,१०,०००/- रुपये किमतीचा मुददेमाल मिळून आल्याने तो गुन्हयाचे तपासकामी जप्त करण्यात आले आहे.

इसम नामे अजयसिंग अर्जुनसिंग दुधानी वय २० वर्षे रा. घरकुल नंबर ७२, सटवाईनगर मांजरी बुद्रुक ता. हवेली जि. पुणे या हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ११६५/२०१९ भादविक ४५४, ४५७, ३८० या गुन्हयात अटक करुन त्याचेकडे तपास करुन ०२ घरफोडीचे, दोन बस मधील चोरीचे व एक मोटार सायकलचा असे एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणले असुन त्याचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेल्या आणखीन ०२ मोटार सायकलींचा तपास चालु आहे.

**यातील अटक आरोपीत अजयसिंग दुधानी याचे वडील अर्जुनसिंग दुधानी हा देखील अट्टल घरफोडी चो-या करणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन सध्या तो मोक्याचे गुन्हयात येरवडा जेल येथे असुन त्याचे पावलावर पाऊल ठेवुन अजयसिंग हा देखील घर फोडी, बसमधील चोरी व वाहनचोरी करतो.**

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त , परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल कलगुटकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक(गुन्हे) हमराज कुमार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, सहा. पोलीस फौजदार युसुफ पठाण, पो.हवा. संपत औचरे, पो.हवा. राजेश नवले, पो.ना. विनोद शिवले, पो.ना. सैदोबा भोजराव, पो.ना. गणेश दळवी, पो.शि. नितीन मुंढे, पो.शि. शाहिद शेख, पो.शि. अकबर शेख, पो.शि. शशिकांत नाळे, पो.शि. अनिल कुसाळकर, पो.शि. ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**हडपसर पोलीस स्टेशन, पुणे**